शिक्षा अंतिम करणेबाबत.
श्री.मंचकराव गंगाराम पोले, आरोग्य सेवक (पुरुष), तत्कालीन प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापुरी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/903e/२०२६
अहिल्यानगर, दिनांक- २६/१०/२०२६

संदर्भ :- १.वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र-चंदनापुरी, ता.संगमनेर यांचेकडील दोषारोप पत्र क्र.प्रा.आ.केंद्र/आस्था/२२/२०२३, दि. ०५/०१/२०२३
२.इकडील दोषारोप पत्र जा.क्र. वशि/आस्था-३/३७१/२०२३ दि.१०/०८/२०२३
३.वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र-चंदनापुरी, ता.संगमनेर यांचे पत्र क्र.प्रा.आ.केंद्र/आस्था/४३४/२०२३, दिनांक- २१/०८/२३ अन्वये श्री.पोले, यांची ज्ञापन दोषारोप पोहोच प्राप्त
४.सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक इकडील आदेश क्र.आरोग्य/आस्था-३/०१७२०/५०१/२०२३, दि.१६/१०/२३
५.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील खाते निहाय चौकशी अहवाल क्र. . विशा-४/खाचौ/सी.आर.२२६/२०२२, दिनांक २४ मार्च २०२३
६.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र. आरोग्य/आस्था-३/१३९/२०२६, दिनांक- २५/०२/२०२६
७.वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र-तळेगांव, ता.संगमनेर यांचेकडील पत्र क्र. आरोग्य/आस्था/१२९/२०२६, दिनांक- २५/०८/२०२६
८.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३
९.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (७)

तुम्ही प्राथमिक आरोग्य केंद्र-चंदनापुरी, ता.संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर येथे आरोग्य सेवक पुरुष या पदावर कार्यरत असताना कर्तव्याचे ठिकाणी दिनांक-१७/०२/२०२२ ते दिनांक-१७/०६/२०२४ या कालावधीत अनधिकृत गैरहजर राहुन कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन व कर्तव्यात कसुर केल्याने या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये तुम्हांस दोषारोपाचे ज्ञापन विविरणपत्र क्र. १ ते ४ बजावणेत आले होते. सदरचे दोषारोप तुम्हांस बजाविण्यात आलेची पोहोच संदर्भ क्र. ३ अन्वये या कार्यालयास प्राप्त आहे. तुमचे विरुध्द ज्ञापन/दोषारोप ज्ञापनान्वये ठेवण्यात आलेले आरोपाबाबत खुलासा सादर केलेला नसल्याने न्याय हक्काचे दृष्टीने खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले होते. त्यानुसार या कार्यालयाकडील संदर्भ क्र.४ अन्वये विभागीय चौकशी सुरू करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-यांची नेमणुक करणेत आली होती.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.५ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडुन चौकशी पुर्ण होवून चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर विभागीय चौकशी अहवाला मध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप पत्रा मधील तीनही आरोप विभागीय चौकशीमध्ये सिध्द झालेले आहेत. विभागीय चौकशीमध्ये दोषारोपांबाबत खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहेत.

आरोप क्र १:- विनापरवाना कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहणे- तुम्ही दिनांक-१७/०२/२०२२ ते दिनांक- १७/०६/२०२४ या कालावधीत वैदयकीय उपचारासाठी रजेवर जाणे भाग पडल्याचे स्पष्ट होत आहे. याबाबत उपचार घेतलेल्याबाबतचे

कागदपत्र देखील सादर केलेले आहेत. तसेच १२ जुन २०२४ चे जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचे फिटनेस सर्टीफिकेट सादर केलेले आहे. या वरुन तुम्हाला वैदयकीय उपचारासाठी कार्यालयीन कामी हजर राहता आले नाही. हे स्पष्ट होत आहे. मात्र खात्याच्या साक्षीदारांच्या साक्षीदारांच्या साक्षी वरुन तुम्ही रजेचे आवेदन सादर केलेले नसल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, सदर आरोप चौकशीअंती अंशतः सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्र २:- वरिष्ठांचा आदेशाचा अवमान करणे- तुमचे विरुध्द खात्याचे साक्षीदारांच्या साक्षी विचारात घेता तुम्हाला बजवायाच्या कारणे दाखवा नोटीसा तुमच्या राहत्या घरावर डकविण्यांत आलेल्या होत्या. त्यामुळे नोटीसा बजविण्यांत आल्या नाहीत किंवा सदर नोटीसा त्यांना प्राप्त झालेल्या नाहीत असे म्हणणे संयुक्तीक ठरत नाही. सवव, तुम्ही सदर नोटीसांचा खुलासा सादर केलेले नसल्याचे स्पष्ट होत आहे. सदर आरोप चौकशीअंती सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

आरोप क्र ३:- प्रशासनाची अडचण निर्माण करणे- तुम्हाला वैदयकीय उपचारासाठी रजेवर जाणे भाग पडल्याचे स्पष्ट होत आहे. याबाबत तुम्ही चौकशी प्राधिकरणास उपचार घेतलेल्याबाबतचे कागदपत्र देखील सादर केलेले आहेत. तसेच त्यांनी १२ जुन २०२४ चे जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचे फिटनेस सर्टीफिकेट सादर केलेले आहे. या वरुन तुम्हाला वैदयकीय उपचारासाठी कार्यालयीन कामी हजर राहता आले नाही व हेतूपुरस्कर कामी गैरहजर राहीले नसल्याचे स्पष्ट होत आहे. तथापि, तुम्ही रजेचे आवेदन सादर केलेले नसल्याचे दिसून आले आहे. सबब, सदर आरोप चौकशीअंती अंशतः सिध्द होत असल्याचा निष्कर्ष नोंदविले आहे.

त्या अनुषंगाने, संदर्भ क्र.६ नुसार या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस अन्वये, विभागीय चौकशीमधील निष्कर्षाशी हे प्राधिकरण सहमती दर्शवित आहे. तुमचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोप प्रपत्रातील आरोप सिध्द होत असलेने तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ चा भंग केल्याचे सिध्द होते. सवव महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ करणे-अशी बडतर्फी सामान्यतः भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल. अशी शिक्षा का करणेत येऊ नये? याबाबतचा खुलासा मागविलेला होता.

संदर्भ क्र.७ नुसार, सदरची अंतिम कारणे दाखवा नोटीस राहाते घरी दिनांक-२४/०५/२०२६ रोजी बजावणेत आली. अदयाप खुलासा अप्राप्त असल्याने प्रस्तावित शिक्षा मान्य असल्याचे दिसून येते.

तरी या आदेशान्वये, संदर्भ क्र.६ चे अंतिम कारणे दाखवा नोटीसव्दारे प्रस्तावित केलेली महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ (७) नुसार सेवेतून बडतर्फ करणे-अशी बडतर्फी सामान्यतः भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल. अशी शिक्षा अंतिम करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.मंचकराव गंगाराम पोले, आरोग्य सेवक (पुरुष), यांच्या मुळ सेवापूस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202610261900133..... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-10-2026 18:26:25
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.मंचकराव गंगाराम पोले, आरोग्य सेवक (पुरुष)

व्दारा व प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र- तळेगांव, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

२/- सदर नोटिसीची प्रत व चौकशी अहवालाची प्रत पान क्र. १ ते श्री.मंचकराव गंगाराम पोले, आरोग्य सेवक (पुरुष), यांना बजाविण्यात येवुन त्यांच्या दिनांकित स्वाक्षरीची पोहच प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

प्रत :- वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र- चंदनापूर, ता.संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर

स्वाक्षरी /-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर